MHYA100000492026

**म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र.०१/२०२६ मधील नि.क्र.१ वरिल आदेश**
**(पारीत दिनांक २८/०७/२०२६)**

१. आज रोजी प्रस्तुतचे प्रकरण अर्जदार यांच्या विधिज्ञांनी बोर्डावर घेतले आहे. अर्जदार, गैरअर्जदार क्र. ०१ व त्यांचे विधिज्ञ न्यायालया समक्ष हजर. अर्जदार, गैरअर्जदार क्र. ०१ यांनी प्रस्तुतचे प्रकरण परत घेण्याची परवानगी मिळणेबाबतचा अर्ज (नि.क्र.२५) दाखल केला असून सदर अर्जाचे स्वरुप पाहता त्यावरील पुढील प्रस्तुत आदेश नि.क्र.१ खाली करण्यात येत आहे.

२. अर्जदार व गैरअर्जदार यांचे सदर अर्जावरील कथन की, त्यांच्या दरम्यान आपसात तडजोड झाली असून अर्जदार यांना सदरचे प्रकरण पुढे चालविणे नसून ते परत घेणे आहे. शेवटी त्यांनी प्रस्तुतचा अर्ज केलेल्या विनंतीप्रमाणे मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली. अर्जदार, गैरअर्जदार क्र. ०१ हे आपआपल्या विधिज्ञांसह न्यायालयात हजर आहेत. उभयपक्षांना अर्ज (नि.क्र. २५) बाबत या न्यायालयाने विचारणा केली असता उभय पक्षांनी प्रस्तुत अर्जामधील मजकूर व त्यावर असलेल्या आपल्या सह्या त्यांना मान्य असल्याचे सांगितले. सदर अर्जावर उभय पक्षांचे विधिज्ञांचे देखील स्वाक्ष–या आहेत. अर्जदारच्या विधिज्ञांनी देखील प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने अर्जदार यांना प्रस्तुतचा खटला मागे घेण्याची परवानगी देण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

Digitally signed by FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI
Date: 2026.07.28 16:23:11 +0530

३. एकंदरीत प्रस्तुत अर्ज (नि.क्र.२५), अर्जदार, गैरअर्जदार क्र. ०१ व उभयपक्षांच्या विधीज्ञांचे कथन यावरून असे दिसून येते की, अर्जदार यांना प्रस्तुतचे प्रकरण

गैरअर्जदार यांच्या विरुध्द पुढे चालविणे नसून त्यांना सदरचे प्रकरण परत घ्यावयाचे (withdrawal) करावयाचे आहे. त्यामुळे अर्जदारच्या वतीने प्रस्तुत अर्जात करण्यात आलेली मागणी मंजुर करणे योग्य असल्याचे दिसून येते. सबब, वरील सर्व बाबींचा विचार करता मी खालील प्रमाणे आदेश परित करीत आहे.

## **आदेश**

१. अर्ज (नि.क्र.२५) मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार यांना प्रस्तुतचे प्रकरण म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र.०१/२०२६ हा मागे घेण्याची ( withdrawal) परवानगी देण्यात येते.

३. अर्जदार, गैरअर्जदार व त्यांचे विधिज्ञांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

४. येणेप्रमाणे प्रकरणाची कार्यवाही संपुष्टात आली.

Digitally signed by FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI
Date: 2026.07.28 16:23:03 +0530

(एफ.के.सिद्दीकी)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
केळापूर

दिनांक २८/०७/२०२६.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | V. R. Gulhane |
| Court Name | : | J.M.F.C., Kelapur |
| Date | : | 28/07/2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 28/07/2026 |
| Judgment uploaded on | : | 28/07/2026 |

**XXXX**